Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट दि. ०५/१०/२०२०

## चाकण येथील खुनाचे गुन्हयातील आरोपी ४८ तासात गजा आड पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा , युनिट-३ ची कामगिरी

दिनांक ०३/१०/२०२० रोजी मौजे चाकणगावचे हददीत पुणे नाशिक हायवे रोडचे बाजुला भाजी मार्केटच्या पत्र्याचे शेडमध्ये इसम नामे रामदास राजा रामघुंबरे वय-४८ वर्षे,रा.चाकण भाजी मार्केट ता.खेड जि.पुणे मुळ रा.पाथर्डी जि.अहमदनगर याचे डोक्यात कोणीतरी अज्ञात इसमाने दगड घालुन खुन केल्याने चाकण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१०७६/२०२० भा.दं.वि.कलम ३०२ प्रमाणे अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

वर नमुद गुन्हयातील आरोपी बाबत काही एक सुगावा नसलेने व सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३, पिंपरी चिंचवड कडील अधिकारी व कर्मचारी यांची दोन स्वंतत्र टिमत यारकरुन चाकण व चाकण परीसरात अधिक तपास करीत असताना पो.शि. १९४० हनमंते यांना मिळालेल्या बातमी वरुन इसम नामे मनोज हरीप्रसाद कुमरे वय २६ वर्षे रा. सौ. सुमन गायकवाड यांचे झोपडीत, मच्छी मार्केट, चाकण, पुणे मुळगाव सुखापुरापट्टी, पो.स्टे. हर्रई ता. अमलवाडा, जि. छिंदवाडा, राज्यमध्यप्रदेश यास येवले टि स्टॉल समोर तळेगाव चौक, चाकण, पुणे येथून ताब्यात घेवून त्याचेकडे अधिक सखोल चौकशी करतात्याने सांगितले की, सुमारे ०४ महीण्यांपुर्वी यातील मयत रामदा सघुंबरे व मार्केट मधील गाळयांचे मॅनेजर नामे गिते यांनी मार्केट मध्ये थांबायचे नाही व झोपायचे नाही असे बोलुन मारहान करुन शिवीगाळ केली होती. दि.०२/१०/२०२० रोजी रात्री २०/३० वा.चे सुमारास यातील मयत रामदास याने मार्केट मध्ये झोपु नको म्हणुन गलिच्छ शिवीगाळ केली होती त्यांचा राग मनात ठेवुन दि.०३/१०/२०२० रोजी रात्रौ १२:३० वा. चे सुमारास रामदा सघुंबरे हा मार्केट मध्ये झोपला असताना त्यांचेडोक्यात दगड मारुन त्याचा खुन केल्याची कबुली दिली आहे. अशाप्रकारे आरोपी बाबत काही एक सुगावा नसताना कौशल्याने तपास करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदर आरोपीस पुढील कारवाई कामी चाकण पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर आरोपीचे पुर्व चारीत्र पडताळता त्यांचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) चाकण पोलीस ठाणे गु.र.नं.११९९/२०१७ भा.दं.वि.कलम ३९४,३४
२) चाकण पोलीस ठाणे गु.र.नं.१२०९/२०१७ भा.दं.वि.कलम ३९४,३४
३) चाकण पोलीस ठाणे गु.र.नं.६११/२०१९ भा.दं.वि.कलम ३९४,३४

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. कृष्णप्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, मा. पोलीसउप आयुक्त (गुन्हे) श्री. सुधिर हिरेमठ, मा. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.आर.आर. पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर बाबर, सहायक पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, पोलीस उप निरीक्षक गिरीश चामले, कर्मचारी - हजरत पठाण, यदु आढारी, नाथा केकाण, सचिन मोरे, विठठल सानप, गंगाधर चव्हाण, योगेश्वर कोळेकर, महेश भालचिम, राजकुमार हनमते, सागरजैनक, त्रिनयन बाळसराफ, प्रविण पाटील, राहुल सुर्यवंशी, प्रमोद ढाकणे व गजानन आगलावे यांनी केली आहे.